वाचा:- १. शासन वित्त विभाग ज्ञापन क्रमांक. MFD-१३०११/४१/२०१५-FD(ADM-४) दिनांक:-०८.०५.२०१५
२. शासन वित्त विभाग ज्ञापन क्रमांक. MFD-१३०२०/१६/२०१५-FD(ADM-४) दिनांक २३.०३.२०१६
३. शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक वेपुर १२१०/प्र.क्र.१२४(भाग-१)/सेवा-९, दिनांक . ९.०२.२०१३

क्र.स्था १८/ब/वाहन अग्रीम/ कलेप-१/६४५

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोकणभवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४०० ६१४**
**दिनांक:-** 29 MAR 2016

विषय:- मोटार कार / मोटार सायकल/ मोटार स्कुटर खरेदी करण्यासाठी वाहन अग्रीम मंजूर करणेबाबत. (वित्तीय वर्ष २०१५-२०१६)

## आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-१०.०८ / प्र.क्र.७०/ २००८/ विनियम, दिनांक ११/०७/२००१ अनुसार मुख्य लेखापरीक्षक (संचालक), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी या कार्यालयाचे आस्थापना आदेश क्रमांक ४१, दिनांक २/९/२००९ नुसार प्रदान केलेल्या अधिकारान्वये सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई हे हे खालील कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावासमोर रकाना क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण मोटर वाहन अग्रिम रक्कम रुपये ३,१७,६८४/- (अक्षरी रुपये तीन लाख सतरा हजार सहाशे चौऱ्याऐशी फक्त) या आदेशातील भाग-१ मधील नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करीत आहेत.

**आदेशातील कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या अग्रीमाच्या रकमेचे देयक महाराष्ट्र कोषागार नियम क्रमांक ५७ या विहित नमुन्यात संबधित कार्यालयाने त्यांच्या संबधित कोषागार कार्यालयात सादर करण्यात यावे.**

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | मूळ वेतन | कार्यालय | वाहनाचा प्रकार | मंजूर करण्यात आलेली अग्रीमाची रक्कम | मुद्दल अग्रीम वसुलीचे मासिक हप्ते व रक्कम | व्याजाची रक्कम व व्याज वसुलीचे मासिक हप्ते व मासिक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | श्रीम.स्मि.म.जगताप | कनिष्ठ लेखापरीक्षक | वेतन रु.१०४००/- ग्रेड वेतन रु. २८००/- | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, जळगांव | **नवीन स्कुटर** | ५७,६८४/- | पहिला हप्ता १३२०/- व १२८१/- प्रमाणे ४४ हप्ते. | १२ हप्ते (व्याजाची परिगणना सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी व्याजदर बाबत शासनाचे आदेश निर्गमित झाल्यानंतर करण्यात येईल) |
| २ | श्री.मिलिंद बा हुमणे | कनिष्ठ लेखापरीक्षक | वेतन रु.१०४००/- ग्रेड वेतन रु. २८००/- | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, अमरावती | **नवीन मोटर सायकल** | ७०,०००/- | पहिला हप्ता १५८०/- व १५५५/- प्रमाणे ४४ हप्ते. | |
| ३ | श्री.दिपक दि.सावंत | कनिष्ठ लेखापरीक्षक | वेतन रु. ११०००/- ग्रेड वेतन रु. २८००/- | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, बुलढाणा | **नवीन मोटर सायकल** | ७०,०००/- | पहिला हप्ता १५८०/- व १५५५/- प्रमाणे ४४ हप्ते. | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | श्रीम. पुष्पा दि. वाघ | कनिष्ठ लेखापरीक्षक | वेतन रु.११७७०/- ग्रेड वेतन रु. ४२००/- | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, ठाणे | **नवीन स्कुटर** | ६०,०००/- | पहिला हप्ता १६९०/- व १६६६/- प्रमाणे ३५ हप्ते. | |
| ५ | श्री.पुरुषोत्तम ग. तेली | कनिष्ठ लेखापरीक्षक | वेतन रु. ८९००/- ग्रेड वेतन रु. २८००/- | संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई | **नवीन स्कुटर** | ६०,०००/- | पहिला हप्ता १६९०/- व १६६६/- प्रमाणे ३५ हप्ते. | १२ हप्ते (व्याजाची परिगणना सन २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी व्याजदर बाबत शासनाचे आदेश निर्गमित झाल्यानंतर करण्यात येईल) |
| | **एकुण** | | | | | **३,१७,६८४/-** | | |

अ) उपरोक्त वाचातील ३ च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन किमान वेतनाची अट पूर्ण करत असल्याने मोटर वाहन अग्रिम मंजूर करण्यात येत आहे.

ब) उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या अग्रीमाची वसूली रकाना क्र. ८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे माहे **एप्रिल -२०१६ च्या मे-२०१६** मध्ये देय होणाऱ्या वेतनापासून सुरू करण्यात यावी व तसे न केल्यास संचालनालयास कळविण्यात यावे. अग्रीम वसूलीचा मासिक तपशिल नियमितपणे यासोबत जोडलेल्या विवरणपत्रात प्रत्येक महिन्यात कळविण्यात यावा.

का) अग्रिम रकमेच्या वसुलीनंतर त्यावरील व्याजाच्या रकमेचे हप्ते निश्चित करतांना अग्रिमाचे हप्ते विचारात घेऊन ते खालीलप्रमाणे निश्चित करावे.

| अग्रीमाची वसूली | | |
|---|---|---|
| १. | नवीन मोटार कार | व्याजासह जास्तीत जास्त १६० हप्ते |
| २. | जुनी मोटार कार | व्याजासह जास्तीत जास्त ८० हप्ते |
| ३. | नवीन मोटार सायकल | व्याजासह जास्तीत जास्त ६० हप्ते |
| ४. | जूनी मोटार सायकल | व्याजासह जास्तीत जास्त ३० हप्ते |
| ५. | नवीन स्कूटर | व्याजासह जास्तीत जास्त ४८ हप्ते |
| ६. | जूनी स्कूटर | व्याजासह जास्तीत जास्त २४ हप्ते |

तथापि नियत / स्वेच्छा सेवानिवृत्तीचा दिनांक उपरोक्त नमूद कमाल हप्त्यापूर्वी येत असल्यास संपूर्ण अग्रीमाची वसूली व्याजासह सेवानिवृत्तीपुर्वी होईल याबाबत खबरदारी घ्यावी.

ड) आदेशातील वाचा क्र. ०१ मध्ये नमूद केलेल्या शासन ज्ञापनान्वये विद्यमान वित्तीय वर्ष २०१५-१६ करिता निधीची उपलब्धता प्राप्त झाली आहे.

इ) या अग्रिमाकरिता होणारा खर्च मागणी क्र. जी -१० प्रधान शिर्ष ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्ज (वित्त विभाग) गौण शिर्ष २०२ (००) (०१) मोटार वाहन खरेदी अग्रीमे, (७६१०-०३३-६) या अर्थसंकल्पिय लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष **२०१५-२०१६ मध्ये खर्ची टाकण्यात येत आहे.**

-३-

(परिशिष्ट)

**(सर्वसाधारण महत्वाच्या सूचना)**

१. या आदेशातील कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या अग्रीमाची रक्कम प्रदान करण्यापूर्वी त्यांच्याकडून प्रथम मुंबई वित्तीय नियमावली १९५९ मधील विहित नमुना क्रमांक २० मधील करारनामा (ॲग्रीमेंट) घेण्यात यावा. व सदर करारनामा संचालनालयाकडे पाठविण्यात यावा.

२. मोटार सायकल / स्कूटर खरेदीचा व्यवहार पूर्ण होताच प्रतिभूती (सिक्यूरिटी) म्हणून विहित नमुना क्र. २१ मध्ये गहाण बंधपत्र (मॉरगेज बॉन्ड) रक्कम काढल्याचा दिनांकापासून एक महिन्याच्या आत या संचालनालयास सादर करावे. खरेदी केलेल्या मोटार सायकल / स्कूटरची मूळ किंमत निर्मात्याचे नांव, वर्णन, सिलेंडर्सची संख्या, इंजिन क्रमांक व चेसी क्रमांक वगैरे तपशिल विहित नमुना क्र.२१ मधील विर्निदेशन अनुसूचीमध्ये उल्लेखिलेल्या प्रमाणे सविस्तर असावा.

३. वाहन खरेदीचा संपूर्ण तपशिल असणारे आर.सी.बुकची सत्यप्रत मोटार सायकल / स्कूटरची प्रत्यक्ष रक्कम चूकती केल्याची मुद्रांकित रोख पावतीची सत्यप्रत इत्यादी माहिती अग्रीम प्रदान झाल्यानंतर अतितात्काळ संबधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करावी.

**४. ज्या वाहन प्रकारासाठी अग्रीम मंजूर केले आहे तेच वाहन खरेदी करण्यासाठी अग्रीम उपयोगात आणावे. (उदाहरणार्थ मोटार सायकल ऐवजी स्कूटर खरेदी करणे किंवा नवीन वाहनाऐवजी जूने वाहन खरेदी करणे इत्यादी प्रकार म्हणजे वाहन अग्रीमाचा गैरवापर होय). अग्रीमाचा गैरवापर केल्यास शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अग्रीम- १०९५/ प्र.क्र.७० / ९५/ विनियम, दिनांक २६/९/१९९७ अनुसार मंजूर केलेली संपूर्ण अग्रीम रक्कम दंडनीय व्याजासह वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.**

५. खरेदी केलेल्या वाहनाची किंमत ही मंजूर करण्यात आलेल्या अग्रीमापेक्षा जर कमी असेल तर उरलेली अग्रीमाची रक्कम अनुक्रमांक ८ मध्ये नमूद केलेल्या अग्रीमाच्या लेखा शिर्षाखाली तात्काळ जमा करावी.

६. वाहन खरेदीचा व्यव्हार पूर्ण होताच खरेदी केलेल्या वाहनाचा विमा त्वरीत **विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण इमारत, १ ला माळा, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१** यांचे मार्फत उतरविण्यात यावा. व अग्रीमाची संपूर्ण रक्कम व्याजासह परतफेड होईपर्यंत तो सतत चालू राहील याची दक्षता घेण्यात यावी. (प्रता सोबत जोडली आहे) **अन्य विमा कंपनीकडून विमा उतरविल्यास तो मान्य करण्यात येणार नाही.** विमा पत्राचे नूतनीकरण विमा कालावधी संपण्यापूर्वी १५ दिवस आगोदर विमा हप्ता भरुन करणे आवश्यक आहे.

**७. संबधित कर्मचाऱ्यांच्या सेवापूस्तकात वरील अग्रीमाची नोंद घेण्यात यावी**

**८. मुद्दल व व्याजाच्या रकमा त्यासाठी विहित केलेल्या लेखा शिर्षाखाली स्वतंत्ररित्या भराव्यात. अग्रीमाच्या मुद्दलाची वसूली प्रधान शिर्ष ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे २०२ मोटार वाहनाच्या खरेदीसाठी आगाऊ रकमा संगणक सांकेतांक (७६१०-५०२-४००) या शिर्षाखाली आणि व्याज वसूलीच्या रकमा ००४९ (४५) (२) व्याजाच्या जमा रकमा ८०० इतर जमा रकमा (००४९००६९००) या शिर्षाखाली जमा करण्यात याव्यात.**

**९. अग्रीम मंजूरीच्या दिनांकापासून एका महिन्याच्या विहित मुदतीत मंजूर केलेले वाहन खरेदी न केल्यास संपूर्ण अग्रीम रक्कम दंडनीय व्याजासह एक रकमी वसूल करण्यात येईल.**

१०. ज्यावेळी अग्रीमाची अथवा त्यावरील व्याजाची वसुली चलनाने कोषागारात जमा केली जाते अशा प्रकरणी सबंधित विहित लेखाशिर्ष, मूळ अग्रीम रक्कम व त्याचा प्रमाणक क्रमांक आणि दिनांक इत्यादी तपशिल चलनावर ठळकपणे नमूद करावे. तसेच अशा प्रकरणी कोषागार कार्यालयाकडून जमेची खातरजमा करून पडताळणी प्रमाणपत्राची प्रत संचालनालयास पाठवावी.

११. संचालनालयाने व्याजाची रक्कम आकारणी करुन काढेपर्यंत वरील कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालय प्रमुखांनी देय होणाऱ्या व्याजाची वसूली शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अग्रीम १०९९ /व्याज दर / प्र.क्र.४९/९९ / विनियम, दिनांक ०५/०५/२००० मधील परिशिष्ट दोन मध्ये दर्शविलेल्या सुत्राप्रमाणे करावी. व वसूलीचा तपशिल संचालनालयास प्रतिमाह कळविण्यात यावा.

१२. काहि अपरिहार्य कारणास्तव अग्रीम आणि त्यावरील व्याजाची रक्कम वसूल होणे शिल्लक राहिल्यास ती रक्कम कर्मचाऱ्यांच्या मृत्यू नि सेवा उपदानातून एकरकमी वसूल करावी. तद्नंतरच ना देय/ ना मागणी प्रमाणपत्र देण्यात यावे.

**१३. एखाद्या कर्मचाऱ्यांनी निश्चित केलेल्या अग्रीम वसूलीच्या हप्त्याच्या रकमेपैकी जास्त रकमेचा हप्ता भरावयाची भविष्यात विनंती केल्यास निश्चित केलेल्या हप्त्यांच्या रकमेचा पटीत वसूली करण्यात यावी. म्हणजेच एक हप्त्या ऐवजी दोन किंवा तीन हप्त्यांची रक्कम एकत्रित भरणे तथापि हप्त्यांच्या संख्येत बदल करण्यात येऊ नये.**

**१४. कर्मचाऱ्यांची सध्याच्या कार्यालयामधून बदली झाल्यास अग्रीमाच्या पुढील वसूलीकरिता त्याचा संपूर्ण तपशिल त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्र स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. जेणेकरून अग्रीमाची वसूली वेळेवर व अचूकरित्या होऊ शकेल. तसेच अग्रीमाच्या वसूलीची माहिती सोबतच्या विवरणपत्रात पाठविण्याविषयी नवीन कार्यालयास सूचित करण्यात यावे.**

..५..

१५. अग्रीम घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांना देय असलेल्या व्याजाच्या रकमेची ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत. त्या कार्यालय प्रमुखांकडून तत्परतेने पडताळणी करुन घ्यावी. एकदा मुद्दलाची संपूर्ण परतफेड केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत देय होणाऱ्या व्याजाची वसूली लांबणीवर टाकू नये. **अग्रीमाचा शेवटचा हप्ता वसूल केल्यानंतर त्यानंतर लगेचच येणाऱ्या महिन्यापासून व्याज वसूलीस प्रारंभ करावा.**

**१६. या आदेशातील कर्मचाऱ्यांना अग्रीम मंजूरीच्या दिनांकापासून पाच वर्ष पुर्ण झाल्याशिवाय दुसऱ्यांदा वाहन अग्रीम अनुज्ञेय राहणार नाही.**

**१७. या आदेशातील कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालय / विभाग प्रमुखांनी अग्रीमाची वसूली दरमहा नियमितपणे कर्मचाऱ्यांना वेतनातून करावी आणि त्याचा हिशोब ठेवावा. अग्रीम रकमेवरील व्याजाचे निर्धारण करणे, थकबाकीवर संबधितांना सूचना देणे आणि मंजूरीनंतर सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे विहित कालावधीत संबधित कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित कार्यालयाची/ विभागाची राहील.**

29/3/16.

**सहसंचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**नवी मुंबई.**

29/3/2016

प्रति,

१. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जळगांव/अमरावती/बुलढाणा/ठाणे.
२. काषागार अधिकारी ,उपकोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.

प्रत सविनय सादर,

अवर सचिव, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग (प्रशासन ४) (व्यय/ प्रशासन / विनियम), मंत्रालय, मुंबई.

प्रत सस्नेह अग्रेषित

१. महालेखापाल (लेखापरीक्षण), महाराष्ट्र-१, मुंबई.
२. महालेखापाल (लेखापरीक्षण), महाराष्ट्र-२, नागपूर

प्रत अग्रेषित:-

१. सहाय्यक संचालक (प्रशासन), स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय, नवी मुंबई.
२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, जळगांव/अमरावती/बुलढाणा/ठाणे.
३. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नाशिक/अमरावती/कोकण.
४. रोखपाल, स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय, नवी मुंबई.
५. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या वैयक्तिक नस्तीस (१ प्रत)
६. निवडनस्ती मुख्यालय.

Kalep-१/Advance/Vahan agrim adesh/२९०३२०१६

महाराष्ट्र शासन

क्रमांक: MFD-13020/16/2015-FD(ADM-4)
वित्त विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ .०३.२०१६.

**विषय : शासकीय कर्मचाऱ्यांना २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात मोटार वाहन खरेदी अग्रिम मंजूर करण्यासाठी निधी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र**
**मागणी क्रमांक : जी-१०**
**प्रधान शीर्ष : ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे** (वित्त विभाग)
**गौणशीर्ष: २०२ (००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे** (७६१००३३६)

**ज्ञापन:**

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांना त्यांचे पत्र क्र.स्था-१८/व/वाहन अग्रिम/निधी प्रमा/सन २०१५-१६/कलेप-४/५२९, दिनांक १४.०३.२०१६ च्या संदर्भात कळविण्यात येते की, सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात वरील मागणी क्रमांक व प्रधानशीर्षातील गौणशीर्षाखाली चिन्हांकित करण्यात आलेल्या अनुदानातून स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवरील सोबत जोडलेल्या यादीतील ५ कर्मचाऱ्यांना रु.३,१७,६८४/- (अक्षरी रुपये तीन लाख सतरा हजार सहाशे चौऱ्याऐंशी फक्त) इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. त्यांना असेही कळविण्यात येते की, उक्त प्रयोजनार्थ प्राप्त झालेल्या सर्व अर्ज /प्रस्तावांची छाननी व तपासणी करणे, ते परिपूर्ण असल्याची खात्री करणे याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालयाची राहील.

३. तसेच मंजूर केलेल्या वाहन अग्रिमाच्या आदेशाची प्रत, प्राधिकृत देय रकमेचे पत्र व इतर तपशीलासह (म्हणजेच प्रमाणक क्रमांक, दिनांक व कोषागाराचे नाव इत्यादी माहितीसह) या विभागास (कार्यासन प्रशा-४) अग्रेषित करण्यात यावी.

४. उपलब्ध केलेली रक्कम किंवा त्या रकमेचा काही भाग जर वापरला गेला नाही तर तसे या कार्यासनास (प्रशासन-४) त्वरित कळवावे. सदर मंजुरी दिलेल्या अग्रिमाचा विनियोग त्याच प्रयोजनासाठी करण्यात येत आहे याची खात्री करण्यात यावी.

५. अग्रिम मंजूर करण्यासाठी सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाकरिता या विभागासाठी चिन्हांकित केलेल्या अनुदानापेक्षा अधिक अनुदान मंजूर केले जाणार नाही. तसेच सदरहू खर्च वरील मागणी क्रमांक व प्रधानशीर्ष /गौणशीर्षाखाली नोंदला गेला आहे याची संबंधित लेखा विभागात खात्री करुन घेण्यात यावी.

(दे. पां. कोळपकर)
कक्ष अधिकारी, वित्त विभाग.

प्रति,

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई

प्रत : निवड नस्ती कार्यासन प्रशासन-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३८१/प

(ज्ञापन क्र. क्रमांक: MFD-13020/16 /2016-FD (ADM-4). दिनांक २३ .०३.२०१६ चे सहपत्र)

स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना वाहन अग्रिम मंजूर करण्याबाबतची यादी.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव, पदनाम | कार्यालयाचा पता | मंजूर करण्यात येत असलेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती स्मि. म. जगताप, कनिष्ठ लेखापरीक्षक | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, जळगांव | रु.५७,६८४/- |
| २. | श्री. मिलिंद बा हुमणे ,कनिष्ठ लेखापरीक्षक | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, अमरावती | रु.७०,०००/- |
| ३. | श्री.दिपक दि. सावंत, कनिष्ठ लेखापरीक्षक | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, बुलढाणा | रु.७०,०००/- |
| ४. | श्रीमती पुष्पा दि. वाघ, कनिष्ठ लेखापरीक्षक | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, ठाणे | रु.६०,०००/- |
| ५. | श्री. पुरुषोत्तम ग. तेली, कनिष्ठ लेखापरीक्षक | संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई | रु.६०,०००/- |
| | | एकूण | रु.३,१७,६८४/ |
| | (रुपये तीन लाख सतरा हजार सहाशे चौऱ्याऐंशी फक्त) | | |

(दे.पा.कोळपकर)
कक्ष अधिकारी, वित्त विभाग